जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७३५ दिनांक - ०७/१०/२०२३**

गुन्हे शाखा, युनिट-०३,पुणे शहर

## जन्मठेपेची शिक्षा झालेला व ११ वर्षापासून पॅरोलवरून फरार असलेल्या गुन्हेगारास त्याचे दोन साथीदारांसह दोन पिस्टल व चार राऊंडसह केले जेरबंद

दि.०५/१०/२०२३ रोजी गुन्हे शाखा,युनिट ३,पुणे कडील सहायक पोलीस फौजदार संतोष क्षीरसागर यांना बातमी मिळाली की,११ वर्षापासून पॅरोल रजेवरून फरार असलेला आरोपी नामे खुशाल भुंडे रा.बावधन, जि.पुणे हा गेली ११ वर्षापासून फरार असून तो चांदणी चौकतील वेधभवन जवळ मित्राची वाट बघत थांबलेला असलेबाबत बातमी मिळाल्याने त्यास सदर बातमीचे ठिकाणी जावून शोध घेता चांदणी चौकाकडून वारजेकडे जाणा-या सर्व्हिस रोडवरील वेधभवन पासून २०० मीटर अंतरावर,पुणेयेथे **१) खुशाल चिंधु भुंडे वय ५३ वर्षे,रा.शिवसेना ऑफिसजवळ,बावधन,ता.मुळशी,जि.पुणे, २) अमित बाळासाहेब दगडे वय ३७ वर्षे,रा.सदर ३) मनिष सहदेव मोरे वय ३५ वर्षे रा.सदर** असे तिघे मिळून आले.त्यांचेकडे दोन पिस्टल, चार जिवंत राऊंड,एक रॅम्बो चाकु,तीन मोबाईल हॅन्डसेट व एक मोटर सायकल असा एकुण १,२०,०००/- चा माल मिळून आलेला आहे.

आरोपी नामे खुशाल चिंधु भुंडे याचेकडे केले तपासात त्याचेविरूध्द **हिंजवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर १९४/२००६ भादंविक ३०२,३४** प्रमाणे गुन्हा नोंद असून सदर गुन्हयामध्ये त्यास जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. नमुद आरोपी शिक्षा भोगत असताना त्याने सन २०१२ मध्ये पॅरोल रजेकरीता अर्ज केला होता.त्यास रजा मंजूर झाल्यावर रजा भोगून तो मध्यवर्ती कारागृहात हजर होण्याऐवजी तो बगाहा (बिहार) राज्यात पळून गेला.सदर बाबत **माढा पोलीस ठाणे,सोलापुर गुन्हा रजि.नंबर ६२/२०१३ भादंविक २२४** प्रमाणे गुन्हा नोंद आहे.सदर कालावधीत त्याने बिहार,मुजफ्फरनगर (उत्तरप्रदेश) येथे वास्तव्य करत होता.मागिल दिड महिन्यांपासून बावधन,पिरंगुट परीसरात लपून रहात होता.आरोपी नामे खुशाल चिंधु भुंडे याने उत्तरप्रदेशवरून दोन देशी बनावटीचे पिस्टल व चार जिवंत राऊंड घेवून आला होता.नमुद आरोपींविरूध्द वारजे माळवाडी पोलीस ठाणे येथे आर्म ॲक्टचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

आरोपी नामे अमित बाळासाहेब दगडे व मनिष सहदेव मोरे यांचेविरूध्द यापुर्वी हिंजवडी पोलीस ठाणेस खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंद आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार,पुणे शहर, मा.पोलीस सह-आयुक्त,श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे प्रभारी अधिकारी,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.श्रीहरी बहिरट,पोलीस उप-निरीक्षक,अजितकुमार पाटील,पोलीस उप-निरीक्षक,राहुल पवार,पोलीस अंमलदार,संतोष क्षिरसागर,राजेंद्र मारणे,शरद वाकसे,किरण पवार,संजिव कळंबे, सुरेंद्र साबळे सुजीत पवार, ज्ञानेश्वर चित्ते,राकेश टेकावडे, सतीश कत्राळे,प्रकाश कटटे,साईनाथ पाटील,प्रताप पडवाळ,सोनम नेवसे,भाग्यश्री वाघमारे यांचे पथकाने केली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक,गुन्हे शाखा,युनिट-०३,पुणे, अजितकुमार पाटील हे करीत आहेत.